'तुमच्यातील जे ही कादंबरी वाचतील तेही माझ्याप्रमाणेच भावूक होतील. कदाचित जीवनात देवदाससारख्या एखाद्या दुर्दैवी आणि पापी व्यक्तीशी तुमची गाठ पडेल असंही घडेल. त्यावेळी देवदाससारखा मृत्यू आणखी कुणाला येऊ नये अशी प्रार्थना करा. आपल्या समाजात कुणी देवदास असल्यास त्याच्या जीवनाच्या अंतिम टप्प्यावर एखादा ऊबदार स्पर्श त्याच्या हृदयापर्यंत पोहोचावा यासाठी इतर कुणाच्या चेहऱ्यावर थोडी करुणा आणि आपुलकी दिसणं आवश्यक आहे. अखेरचा श्वास घेण्यापूर्वी इतरांच्या डोळ्यात आपल्यासाठी एक अश्रू पाहून तो डोळे मिटेल...'

विख्यात बंगाली लेखक शरदचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या 'देवदास' या कादंबरीच्या अखेरीस असं लिहिलं आहे. एकाहून एक सरस कथा कादंबऱ्या लिहिणाऱ्या शरदचंद्रांची 'देवदास' ही कादंबरी आगळीवेगळी प्रेमकथा कथन करते. शरदचंद्र यांनी १९१७मध्ये ही कादंबरी लिहिली. त्यानंतर साहित्यात अनेक प्रेमकथा आल्या तरी देवदासचं महत्त्व प्रेमीयुगुलांमध्ये कायम राहिलं. पंच्याऐंशी वर्षांनंतरही तिची लोकप्रियता कायम राहिली आणि सिनेमावाल्यांनाही तिच्यावर चित्रपट तयार करायचा मोह आवरता आला नाही. अलीकडे संजय लीला भन्साळी आणि शक्ती सामंता या दोघांना तिने मोहात पाडलंय. भन्साळी यांचा *देवदास* हिंदीत झळकणार आहे तर शक्ती सामंतांचा बंगालीत. दोघेही सिनेसृष्टीतील उत्कृष्ट दिग्दर्शक समजले जातात. शक्ती सामंता यांनी *आराधना*, *अमर प्रेम* आणि *अनुराग* यांच्यासारखे हृदयस्पर्शी चित्रपट तयार केले आहेत तर *खामोशी द म्युझिकल* आणि *हम दिल दे चुके सनम* या चित्रपटांनी संजय लीला भन्साळी यांना यशस्वी दिग्दर्शकांच्या पंगतीत बसवलंय. आता दोघंही ही अमर प्रेमकथा सेल्युलॉईडवर कशी उतरवतात याची उत्सुकता आहे.

अनेक सिनेरसिकांच्या मते की, शरदबाबूंच्या कादंबरीतील प्रेमाचा निर्मळ निर्झर तिच्यावरील चित्रपटातून वाहिल्याशिवाय राहणार नाही. कुठल्याही सिनेसर्जकाला या कादंबरीवर चित्रपट बनवण्याचा अभिमानच वाटेल. म्हणूनच गेली अनेक वर्ष *देवदास* वेगवेगळ्या भारतीय भाषांत पडद्यावर साकारतोय.

१९२९मध्ये प्रसिद्ध बंगाली अभिनेता दिग्दर्शक नरेशचंद्र मित्रा यांनी बंगालीत मूकपट असलेला *देवदास* बनवला होता. बहुधा पडद्यावर असलेला हा पहिला चित्रपट होता. तो फार गाजला नाही. परंतु चुन्नीलालच्या भूमिकेतील नरेशचंद्र मित्राच्या अभिनयाची खूप वाखाणणी झाली होती.

त्यानंतर प्रथमेश बरूआ यांनी *देवदास* नामक प्रथम बोलपट तयार केला. अनेक मूकपटांमुळे बरूआ यांचं चांगलं नाव झालं होतं. चित्रपट बोलायला लागल्यावर त्यांच्या प्रतिभेला आणखी बहर आला. १९३५मध्ये न्यू थिएटर्सच्या बॅनरखाली त्यांनी बंगालीत *देवदास*चं दिग्दर्शन केलं. त्यामध्ये देवदासची मुख्य भूमिका त्यांनीच केली होती. या चित्रपटाचं दिग्दर्शन, अभिनय आणि फोटोग्राफी प्रेक्षकांना आवडली होती.

या चित्रपटाच्या निर्मितीशी अनेक घटना जोडल्या गेल्यात. प्रथमेश बरूआ शरदबाबूंच्या अनेक साहित्यकृतींनी प्रभावित होते. त्यामुळे त्यांच्या नेमक्या कुठल्या साहित्यकृतींवर चित्रपट बनवायचा हे ठरवायला बराच वेळ लागला. शेवटी 'बामूनेर मेये' (ब्राह्मणकन्या) या साहित्यकृतीवर चित्रपट बनवायचा निर्णय बरूआंनी घेतला. पण नंतर त्यांच्या *बामूनेर मेये*चं स्क्रिप्ट अर्धवट तयार झालं असताना त्यांचा विचार बदलला आणि त्यांनी *देवदास*वर चित्रपट तयार करायचं ठरवलं. चित्रपट झटपट तयारही झाला, पण ट्रायल पाहिल्यानंतर न्यू थिएटर्सच्याच काही लोकांनी असूयेनं त्यांना सांगितलं की, चित्रपटातील वेश्यावृत्ती, मद्यपानाचं दूषण आणि निष्ठुर दर्दभरी दृश्यं प्रेक्षक स्वीकारणार नाहीत. एवढंच नव्हे तर असे चित्रपट बनवल्याने न्यू थिएटर्सची बदनामी होईल. तेव्हा तो प्रदर्शित करू नका. हे ऐकून बरूआ चक्रावून गेले. एके दिवशी त्यांनी



खरोखरच चंद्रासारखा मुखडा लाभलेली चंद्रमुखी (माधुरी)



सौम्यतेची मूर्ती पारो (ऐश्वर्या)




माधुरी आणि ऐश्वर्या समवेत देवदासच्या सेटवर संजय लीला भन्साळी



डब्यात गेलेल्या *देवदास*च्या सेटवर गुलजार-हेमा



दाक्षिणात्य *देवदास*मध्ये अकीनेनी नागेश्वर आणि सावित्री



*देवदास*मध्ये जमुना - सायगल



कोलकात्त्यातील एका थिएटरात गुप्तपणे शरदबाबूंना *देवदास* दाखवला. शरदबाबूंना तो खूप आवडला. शरदबाबूंच्या मध्यस्थीमुळे सगळ्या अडचणी दूर होऊन *देवदास* थिएटरमध्ये झळकला.

चित्रपट प्रदर्शित झाल्यावर त्याला केवळ यशच मिळालं असं नव्हे तर भारतीय सिनेमासाठी तो एक मैलाचा दगड ठरला. बरूआ यांच्या अभिनयाची भरपूर वाहवा मिळाली. एका इंग्रजी वर्तमानपत्राने मथळा लिहिला होता. प्रथमेश चंद्र बरूआ तर या यशाने इतके भारावून गेले की त्यांनी *देवदास* हिंदीत बनवण्याची घोषणा केली. देवदासच्या मुख्य भूमिकेसाठी त्यांनी सूरसम्राट के.एल. ऊर्फ कुंदनलाल सायगलना निवडलं. विशेष म्हणजे बरूआ यांनी स्वतः अनेक हिंदी चित्रपटांत भूमिका केलेली असूनही ही भूमिका सायगलना दिली. पार्वती ऊर्फ पारो बनली जमुनादेवी तर चंद्रमुखी आणि चुन्नीलालची भूमिका अनुक्रमे राजकुमारी आणि के.सी.डे यांनी केली. हिंदीतील *देवदास*लाही प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला, पण बंगालीतील *देवदास*च्या तुलनेत सायगल यांना बरूआंसारखा अभिनय करता आला नाही. या चित्रपटाचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य होतं त्याचं संगीत. सायगलच्या आवाजातील जादूने मोहिनी घातली. तिमिर बरन यांच्या संगीताने सजलेल्या गीतांनी अक्षरशः धूम माजवली. यातील सायगलची गाणी आजही बुजुर्ग संगीतप्रेमींच्या संग्रहात असतील.

१९३६मध्ये आलेल्या या *देवदास*नंतर वीस वर्षं *देवदास* बनवण्याचं धाडस पुन्हा कुणी केलं नाही. दरम्यानच्या काळात बरूआ यांनी पुन्हा एकदा पूर्णपणे नवे कलाकार घेऊन *देवदास* बनवण्याचं ठरवलं होतं. परंतु २९ नोव्हेंबर १९५१ रोजी बरूआंचं निधन झालं आणि दुसऱ्या *देवदास*चं स्वप्न साकारलं नाही. परंतु तोपर्यंत बरूआंचे शिष्य बिमल रॉय देवदासच्या प्रेमात पडले होते. त्यांचं स्वप्न १९५५मध्ये साकार झालं. बिमल रॉय हेदेखील शरदचंद्राच्या साहित्याचे चाहते होते. १९५४मध्ये

आधुनिक देवदास कसा आहे?

शरदबाबूंच्या कादंबरीचं संक्षिप्त कथानक असं आहे: देवदास मुखर्जी हा एका जमीनदाराचा मुलगा आहे. त्याच्या शेजारी राहणाऱ्या पार्वतीवर तो निस्सीम प्रेम करतो, परंतु त्याचं रूढीवादी कुटुंब त्याला लग्नाची संमती देत नाही. पार्वतीचं लग्न दुसरीकडे होतं. त्यामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेला देवदास दारूच्या आहारी जातो. नर्तकी चंद्रमुखी त्याच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करते. मृत्यूपूर्वी एकदा पार्वतीला भेटीन असं आश्वासन देवदासने दिलेलं असतं. पण तिच्या गावाजवळच त्याचा मृत्यू होतो आणि त्याची अंतिम इच्छा पूर्ण होत नाही.

ही अजरामर प्रणयकथा पडद्यावर साकारताना प्रत्येक सिनेनिर्मात्याने थोडी सवलत सिनेमॅटिक लिबर्टी घेतली आहे. तसंच देवदासचं मुख्य पात्रही प्रत्येकाने आपल्या खुबीने पडद्यावर आणलंय. त्यामुळे सध्या बनत असलेला संजय लीला भन्साळीचा *देवदास* कसा असेल? तो इतरांपेक्षा वेगळा असेल की पूर्वीच्या चित्रपटांसारखा असेल याची चर्चा सिनेरसिकांत जोरात आहे. संजय लीला भन्साळी त्याची माहिती देताना सांगतात, 'आपण एका महान साहित्यकृतीवर चित्रपट बनवतोय याची मला सतत जाणीव असल्याने मी मूळ कथेला बिलकुल धक्का लावलेला नाही. संपूर्ण कथानकात फार कमी बदल केले. कारण तेवढं आवश्यकच असतं. एखाद्या लोकप्रिय कादंबरीवर चित्रपट तयार करताना सिनेमाच्या भाषेचीही काळजी घ्यावी लागते.'

चाळीस कोटींचं बजेट असलेल्या भन्साळींच्या *देवदास*मध्ये शाहरूख (देवदास), ऐश्वर्या (पारो), माधुरी दीक्षित (चंद्रमुखी) आणि जॅकी श्रॉफ (चुन्नीलाल) हे कलाकार आहेत. *देवदास*च्या चित्रीकरणासाठी पंधरा कोटींचा भव्य सेट दोन वर्षं फिल्मसिटीत लावला होता. भन्साळी यांनी निर्मितीच्या बाबतीत खूपच गुप्तता पाळलीय. त्यांच्या परवानगीशिवाय सेटवर यायला कुणालाही मनाई आहे. भन्साळी यांचा चित्रपट भव्य-दिव्य असेल याची मात्र सर्वांना कल्पना आहे आणि त्यांच्या सादरीकरणाविषयी सिनेरसिकांना खात्री आहे.

हिंदी-बंगालीत अनेक चित्रपट करणाऱ्या शक्ती सामंता यांचा चित्रपट भन्साळींएवढा भव्य नसला तरी त्यांनीही बंगाली चित्रपटसृष्टीची अवस्था बिकट असताना तीन कोटींच्या बजेटचा चित्रपट तयार केला. त्यांच्या चित्रपटात प्रसन्नजीत (देवदास), तापस पॉल (चुन्नीलाल), ऋतूपर्णा (पारो), इंद्राणी हालदार (चंद्रमुखी) यांच्या भूमिका आहेत. चित्रपटाचं शूटिंग कलकत्त्यात झालंय. नंतर हिंदीतही डब करण्याची योजना असलेला हा चित्रपट बंगाली प्रेक्षकांना आवडेल अशी शक्ती सामंताना खात्री आहे.



सुचित्रा सेन-दिलीपकुमारः
पारो आणि देवदास



चंद्रमुखी (वैजयंतीमाला) समवेत दिलीपकुमार



फिल्मसिटीतील देवदासचा भव्य सेट

त्यांनी शरदबाबूंच्या 'दिवराज बहू' या कादंबरीवर चित्रपट बनवला हाता. त्यामुळेच त्यांना *देवदास* बनवण्याची प्रेरणा मिळाली.

बिमल रॉय यांच्या *देवदास*मध्ये बड्या स्टार्सची गर्दी होती. मुख्य भूमिकेत चमकत होता ट्रॅजेडी किंग दिलीपकुमार. सुचित्रा सेन पारोच्या तर वैजयंतीमाला चंद्रमुखीच्या भूमिकेत होती. चुन्नीलालची भूमिका मोतीलालने केली होती. या चित्रपटाबाबत एक मजेदार किस्सा सांगितला जातो. चित्रीकरण चालू असताना एके दिवशी प्रख्यात अभिनेते पहाडी संन्याल दिलीपकुमार आणि बिमल रॉय यांना भेटायला आले. बोलता बोलता त्यांनी दिलीपकुमारना 'तुम्ही प्रथमेश बरूआंचा *देवदास* पाहिला आहे काय?' असं विचारलं. दिलीपकुमारना त्यांचा प्रश्न कळला नाही. त्यांनी होकार देत म्हटलं, 'मी सायगल यांच्यासारखा गाऊ शकलो नाही तरी अभिनयात किंचितही कमी नाही.' तेव्हा संन्याल यांनी त्यांना 'मी बंगाली *देवदास*विषयी बोलतोय.' असं सांगितलं. दिलीपकुमारनी 'नाही' म्हटलं तेव्हा संन्याल म्हणाले, 'सवड असेल तेव्हा जरूर पाहून घ्या.' नंतर दिलीपकुमार यांनी बिमलदांकडे बंगाली *देवदास* पाहण्याचा हट्ट धरला. पुण्याच्या फिल्म अर्काईव्हमध्ये प्रिंट होती. पण बिमलदांचा चित्रपट एवढ्या वेगाने पुढे सरकत होता की दिलीपकुमारच्या मागणीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. चित्रीकरण संपल्यावर बिमल रॉय यांनी दिलीपकुमारना तो चित्रपट दाखवला. तो पाहून दिलीपकुमार म्हणाले, 'बरूआंचा *देवदास* मी आधी पाहिला असता तर कधीही ही भूमिका करण्याची माझी हिंमत झाली नसती. मला प्रथमेश यांच्याइतकी भूमिका जमली नाही.'

दिलीपकुमार यांची ही नम्रताच होती. कारण दिलीपकुमार यांच्या *देवदास*मध्ये बिलकुल कसर नव्हती. सुचित्रा सेन, वैजयंती माला आणि मोतीलाल यांचा अभिनय अनेक वर्षे सिनेरसिकांसाठी अप्रतिम ठरला.

योगायोगाची गोष्ट अशी की आपले गुरू बरूआ यांच्याप्रमाणे बिमल रॉय यांनाही पुन्हा *देवदास* बनवण्याची इच्छा होती. पण त्यांचंही स्वप्न साकारलं नाही. बिमल रॉय यांच्या *बंदिनी* चित्रपटासाठी 'मोरा गोरा रंग लईले...' लिहिणारे गुलजार त्यांना आपले गुरू मानत. सत्तरच्या दशकात दिग्दर्शक म्हणून त्यांचं नाव झालं असताना त्यांनी धर्मेंद्र, हेमामालिनी आणि परवीन बाबीला घेऊन *देवदास* बनवायचं ठरवलं, पण शानदार मुहूर्त सोहळ्यानंतर चित्रपट पुढे सरकला नाही.

सत्तरच्याच दशकात अभिनेता दिलीप रॉय यांनी मात्र बंगालीत *देवदास* तयार केला. सौमित्र चटर्जी (देवदास), सुचित्रा मुखर्जी (पारो), उत्तमकुमार (चुन्नीलाल) आणि सुप्रिया देवी (चंद्रमुखी) यांच्या भूमिका त्यामध्ये होत्या. *देवदास*वर निघालेला हा पहिलाच रंगीत चित्रपट होता. दिलीप रॉयच्या चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचा दर्जा मिळाला नसला तरी त्याला सफलता मिळालीच.

आता २७ वर्षांनंतर संजय लीला भन्साळीचा भव्य *देवदास* येतोय. तो मे महिन्यापर्यंत थिएटरमध्ये येईल अशी आशा आहे. तर शक्तीदांचा *देवदास*ही चित्रीकरण पूर्ण होऊन प्रदर्शनासाठी तयार आहे. या दोन्ही *देवदास*मध्ये चढाओढ जुंपण्याची शक्यता नाही. स्टार्स आणि बजेटच्या बाबतीत भन्साळीचं पारडं जड आहे. शिवाय तो हिंदीत आहे. तेव्हा शाहरूख, माधुरी दीक्षित आणि ऐश्वर्या रॉय यांच्या भूमिका असलेला हा देवदास बरूआ आणि बिमल रॉय यांच्यासारखीच प्रेक्षकांवर मोहिनी घालतो का याचीच खरी उत्सुकता आहे. ●

लहान पण महत्त्वाच्या भूमिकेत जॅकी-माधुरी

केवळ देवदास आणि पारो ही दोन *देवदास*मधील महत्त्वाची पात्रं आहेत हे खरं नाही. तर चुन्नीलाल आणि चंद्रमुखीची पात्रंही महत्त्वाची आहेत हे कादंबरी वाचणाऱ्यांना नक्कीच ठाऊक असेल. त्यामुळेच भन्साळींच्या चित्रपटात माधुरीने चंद्रमुखीची भूमिका आनंदाने स्वीकारलीय. अनेक वर्षांपूर्वी वैजयंती मालानेही असाच सुज्ञपणा दाखवला होता. बिमलदांच्या चित्रपटातील चंद्रमुखीच्या भूमिकेमुळे तिची पुष्कळ प्रशंसा झाली. परंतु तिने या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कार नाकारला. माधुरी दीक्षितचा सूरही काहीसा असाच आहे. ती म्हणते, 'चंद्रमुखीला सहाय्यक नायिका समजणे योग्य नाही. चंद्रमुखी नर्तकी असूनही प्रतिष्ठित स्त्री आहे. देवदासवरील तिच्या प्रेमात स्वार्थ नाही.'

शरदबाबूंच्या कादंबरीत चुन्नीलाल हे असं पात्र आहे की ज्याच्यामुळे देवदास सूरा आणि सुंदरींकडे आकर्षला जातो. हे पात्र मोठं नाही, परंतु त्याचं वेगळं महत्त्व आहे. दर्शकांसमवेत त्याचं नातं तयार होतं. अमर मलिकने चुन्नीलालची भूमिका करून बारूआना आव्हान दिलं होतं. नंतर मोतीलालने या भूमिकेत प्राण फुंकून दिलीपकुमारला टक्कर दिली. आता भन्साळींच्या चित्रपटात जॅकी श्रॉफ ही भूमिका साकारतोय. भन्साळी यांनी सलमान खान आणि गोविंदाचा या भूमिकेसाठी विचार केला होता, पण शेवटी जॅकीची निवड केली. तो म्हणतो, 'आज मी कारकीर्दीच्या अशा वळणावर आहे की जिथे मुख्य भूमिकेहून चांगली भूमिका करण्यात मजा वाटते. भूमिका दोन दृश्यांची असली तरी पॉवरफूल हवी. मोतीलालसारख्या महान अभिनेत्यांनी केलेली भूमिका न करण्याचं कारणच नव्हतं.